**सं.फौ.ख.क्र. ५८७/२०२२**
**सरकार -वि- संतोष सदाशिव वानरे**
नि. क्र. १२
CNR No - MHAM120014722022

**<u>श्री. स.दि.कमलाकर, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दर्यापूर यांचे न्यायालय</u>**

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | : | दि. १४.०३.२०२२ रोजी ०९.३० ते ०९.४५ वाजता |
| २. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | दि. १७.०३.२०२२ |
| ३. फिर्याददाराचे नाव | : | विष्णू मोतीराम अखंडे, |
| ४. आरोपीचे नाव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान, इत्यादी | : | संतोष सदाशिव वानरे,<br>वय – ४२ वर्ष, व्यवसाय – मजूरी,<br>रा. रेल्वे गेट जवळ, लहान उमरी, ता. व जि. अकोला,<br>ह.मु. अंबादास महाराज संस्थान,<br>कान्होली, ता. दर्यापूर,<br>जिल्हा - अमरावती. |

५. ज्या बद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला या अपराधाचा तपशील -

तुम्ही दिनांक १४.०३.२०२२ रोजी रात्री ०९.३० ते ०९.४५ वाजेच्या दरम्यान मौजा लखापूर फाटा, दर्यापूर ते अमरावती रोड, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे सार्वजनिक रस्त्यावर तुमच्या ताब्यातील चारचाकी वाहन नोंदणी क्र. एम.एच.२७/ बी. झेड.– ७५७२ हे वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने तसेच मानवी जिवीत धोक्यात येईल अशा रितीने चालविले व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **२७९** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीचे जावई अनिल कास्देकर यांची मोटार सायकल क्र. एम.पी.४८/एम.झेड.-८५७१ ला धडक मारुन अपघात करुन तुम्ही स्वत:ला साध्या स्वरुपाच्या दुखापती पोहोचविल्या व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३३७** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून समोरुन येणाऱ्या मोटार सायकल क्र. एम.पी.४८/एम.झेड.-८५७१ हिला धडक देऊन अपघात करुन त्यावरील

फिर्यादीचे जावई अनिल कास्देकर आणि कमलेश नंदकिशोर बायस्कार यांना गंभीर दुखापती पोहोचविल्या व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३३८** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने तसेच वाहतुकीच्या नियमांकडे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अपघात केला परंतू अपघाताची माहिती पोलीसांना न देता व अपघातातील जखमींना उपचारासाठी नजिकच्या दवाखान्यात घेऊन न जाता अपघात स्थळावरुन पळून गेलात व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम **१३४** चा भंग करुन कलम **१८७** अन्वये गुन्हा केला आहे.

**<u>प्रमाणपत्र</u>**

आरोपातील मजकूर आरोपीला मातृभाषेत समजावून सांगण्यात आला. त्याची जबानी वेगळी नोंदविण्यात आली.

<u>आरोपीचे प्रतिकथन</u>

प्रश्न क्र. १ : तुम्हाला पोलीस चालानाच्या नकला मिळाल्यात का?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : तुम्हाला आता मातृभाषेत समजावून सांगण्यात आलेला अपराधाचा तपशिल समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर : नाही. मला गुन्हा कबूल नाही.

-------------------

(आरोपीची सही)

दिनांकः ०९.०९.२०२५

SAMEER DILIP KAMALAKAR

Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2025.09.09 18:02:35 +0530

(स. दि. कमलाकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
दर्यापूर.